रेग्युलर दिवाणी दावा क्र.४३९/२०१६
बशीर वि. नाजम व इतर
नि.क्र.८३/ क (सोबत)

वादीतर्फे साक्षीदार क्र.२

**उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. जी.व्ही. कोदळे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. मी काझी मोहल्ला, लातूर येथे राहतो. वादी क्र.१ शेती करतो. वादी क्र.२ लातूर येथे वकीली करतात. वादी माझे नातेवाईक नाहीत. माझी व वादीच्या वडीलांची वैयक्तीक ओळख नाही. मी एम.एस.ई.बी. मध्ये हेल्पर म्हणून कामाला होतो व सन २०१६ मध्ये निवृत्त झालो. बेवनाळ येथे माझे येणे जाणे होत नाही. वादीच्या जमिनीचा पुर्वी सर्वे क्र.६८ होता व त्याचे गट क्र.५४ व ५५ पडले. सदर जमीन गावाच्या कोणत्या बाजुला आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत ही प्रतिवादीच्या वडीलांनी खरेदी केलेली जमीन आहे. साक्षीदार सांगतो की, सदर जमीन वडीलोपार्जित आहे परंतु ती कोणाकडून कशी आली हे मला माहीत नाही. दाव्यातील वादी व प्रतिवादी हे मुळचे कोणत्या गावचे आहेत हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे वडील व प्रतिवादीच्या वडीलांचे रक्ताचे नाते नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये वादी व त्यांच्या वडीलांचा कोणताही हक्कसंबंध नाही. वाद मिळकतीचा ७/१२ उतारा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकती प्रतिवादीच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील मजकूर वादी क्र.२ ने तयार केलेला आहे व मी त्यावर सह्या केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.२ ने माझ्या शपथपत्रात चुकीचा मजकूर लिहीलेला आहे. वादी व प्रतिवादी वडील हे चुलत भाऊ होते हे दर्शवणारा कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांचा एकमेकांशी कोणतेही नाते नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादीच्या वादाबाबत मला वादीनी सांगितले होते. वादी व प्रतिवादीचे वाद हायकोर्टापर्यंत वादीच्या विरोधात गेले असून त्याचा निकाल प्रतिवादीच्या बाजुने लागला आहे, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी बेवनाळ येथे राहत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ हा अंकुलगा सय्यद येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.२ हा लातूर येथे राहतो. वादी क्र.३ कोठे राहतात हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ चे वडील मला कधीही भेटले नाही व ते आमच्या घरी कधीही आले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, महेबुब व त्यांच्या वारसांना मी आजही ओळखत नाही. मी जी प्रतिवादींची नावे सांगितले आहे त्या नावाचे व्यक्ती आज न्यायालयात हजर नाहीत. गट क्र.५४ च्या चतुःसीमा मला आठवत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला काहीही माहिती नसताना मी प्रतिवादी माझे नातेलग नसताना आज रोजी मी खोटे शपथपत्र दाखल करुन वादीच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.04.22 17:26:53 +0530

दि.२२/०४/२०२५

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.